सत्यमेव जयते

**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण**
**महाराष्ट्र राज्य, पुणे**
**जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे - ४११००१**

**मधुकर चौधरी**
भा. प्र. से. (से. नि.)
**आयुक्त**
**राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण**

कार्यालय : ०२०-२६०५०६४१
Email : comscea.pune@maharashtra.gov.in
secscea.pune@maharashtra.gov.in

अ.शा.पत्र क्र.रासनिप्रा/सहकारी संस्था/सुचना/२०१४/५९४
दिनांक :-२९ ऑक्टोबर, २०१४

प्रिय श्री

राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका सन २०११-१२ पासून विविध कारणास्तव संपन्न झालेल्या नसल्यामुळे सद्यस्थितीमध्ये संचालक मंडळाच्या मुदती संपूष्टात येऊन निवडणूकांसाठी पात्र असलेल्या सहकारी संस्थांची संख्या ही प्रत्येक जिल्हयात फार मोठी आहे. सुधारित सहकारी कायद्यातील कलम ७३ (सीबी) मधील उपकलम १५ अन्वये या प्रलंबित सहकारी संस्थांच्या निवडणूका डिसेंबर, २०१४ पुर्वी घेण्याची स्पष्ट तरतूद आहे. विविध न्यायालयीन प्रकरणांमध्ये देखील शासनाच्या वतीने हया निवडणूका डिसेंबर २०१४ पर्यंत घेण्यात येतील अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहे. सुधारित सहकारी कायद्याच्या पार्श्वभूमीवर राज्यशासनाने महाराष्ट्र सहकारी संस्था (समित्यांच्या निवडणूका) नियम २०१४ प्रकाशित केले आहेत. गेल्या महिन्याच्या शेवटच्या आठवडयात या निवडणूक नियमांच्या प्रती शासकीय मुद्रणालयाकडून प्राप्त झाल्यानंतर त्वरीत सर्व जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-यांना वितरीत करण्यात आलेल्या आहेत. एवढेच नव्हे तर नियमांच्या प्रती सर्व क्षेत्रीय अधिकारी अर्थात, प्रामुख्याने तालुका सहाय्यक निबंधकांकडे देखील प्राप्त झाल्याची खातरजमा करण्यात आलेली आहे. पुढीत दोन ते तीन महिन्यात सहकारी संस्थांच्या होणा-या या निवडणूक कामाची व्याप्ती एवढी मोठी आहे की सहकार विभागातील उपलब्ध मनुष्यबळ देखील या निवडणूका घेण्यासाठी अपुरे ठरणार आहे. नवीन कायदा, नवीन निवडणूक नियम, नवीन उपविधी, नव्याने विहीत केलेले आरक्षणे, मतदानाच्या अधिकाराचे बदललेले स्वरुप इ. गोष्टी लक्षात घेता राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या सभासदांना याबाबतची माहिती होणे हे केवळ आवश्यकच नाही तर अपरिहार्य आहे. सहकार विभागातील वरीष्ठ अधिका-यांना याची पुर्वकल्पना देण्याच्या हेतुने या संदर्भात सर्व सहाय्यक निबंधक, उपनिबंधक यांच्या परीषदेमध्ये दि.२५-०८-२०१४ रोजी प्राधिकरणातर्फे सादरीकरण देखील करण्यात आले होते. VAMNICOM येथे दोन दिवसांच्या जिल्हा उपनिबंधकांच्या बैठकीमध्ये हयासंदर्भात करावयाच्या सविस्तर नियोजनाबाबत चर्चा देखील करण्यात

Co-operative Election Authority ★ Maharashtra State, Pune - 1

आली आहे. या दोन्ही प्रसंगी जिल्हा उपनिबंधकांना त्यांच्या सर्व तालुक्यातील सहाय्यक निबंधकांनी संस्था प्रकारनिहाय बैठक घेऊन संस्थांच्या पदाधिका-यांना या संदर्भातील तदतूदी अवगत करण्याबाबत स्पष्ट सुचनाही देण्यात आलेल्या आहेत.

भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद २४३ झेडके, तसेच महाराष्ट्र राज्य सहकार अधिनियम १९६० चे कलम ७३ (सीबी) व अनुषंगिक नियमानुसार आगामी निवडणुका हया राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली पार पडणार आहेत. हया दृष्टीकोनातून प्राधिकरणाने हयासंदर्भात सहकारी संस्थांच्या निवडणूकांमधील सामान्यत: दृष्टोत्पत्तीस येणा-या सर्व दोषांचे निराकरण करुन निवडणूका हया मोकळया, भयमुक्त वातावरणात व अचूक अशा पारदर्शक पध्दतीने पार पाडण्याबाबत धोरण निश्चित केले आहे. हयानुसार प्रामुख्याने निवडणुकीसाठीची मतदारयादी निर्दोष, अचुक व नियमानुसार असणे, निवडणूक प्रक्रिया पारदर्शक असणे, निवडणूक प्रक्रियेतील अपप्रवृतीचे निराकरण करणे, आचारसंहितेची अंमलबजावणी करणे, निवडणूक खर्चावर नियंत्रण असणे, मतदान हे अधिकृत ओळखपत्रानुसारच होणे या बाबींचा समावेश होतो.

जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी या नात्याने आपापल्या अधिकार क्षेत्रातील सहकारी संस्थांच्या निवडणूका या खुल्या व पारदर्शक पध्दतीने व नियमांचे अचुक व काटेकोरपणे पालन करुन तसेच निर्दोष अशी मतदार यादी तयार करुन व्यवस्थीत करण्याची संपूर्ण जबाबदारी ही आपल्यावर आहे. या पार्श्वभूमीवर आपल्या निदर्शनास खालील बाबी आणण्यात येत आहेत.

१) निवडणूक नियम ४ मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अ,ब,क,ड या वेगवेगळया प्रकारांमध्ये जिल्हयातील एकूण तालुकानिहाय संस्था किती आहेत व त्यापैकी किती संस्थांच्या निवडणूका या **दि.३१-१०-२०१४** पर्यंत प्रलंबित असल्यामुळे त्वरीत घेणे आवश्यक आहे, याची अचुक माहिती संकलीत करण्यात यावी.

Co-operative Election Authority ... ashtra State

२) ज्या सहकारी संस्थांच्या संचालकमंडळाची मुदत **दि.३१-१०-२०१४** पर्यंत संपूष्टात आलेली आहे अशा संस्थांकडून निवडणूक नियमातील नमुना ई-२ या प्रपत्रात अचुक माहिती भरुन घेणे व ही माहिती संकलीत करणे अत्यावश्यक आहे.

३) प्राधिकरणाने या सर्व निवडणूका टप्याटप्याने घेण्याची ठरविले असून सुरुवातीस “ड” प्रकारच्या सर्व संस्थांच्या निवडणूका या दि.२३-११-२०१४ पर्यंत पुर्ण करण्याचे योजीले आहे. आता केवळ दि.३१-०३-२०१३ पुर्वी निवडणूकीस पात्र अशा “क” व “ड” प्रकारच्या संस्थांच्याच निवडणूका घ्यावयाच्या नसून दि.३१-१०-२०१४ पर्यंत निवडणूकीसाठी पात्र अशा सर्व संस्थांच्या निवडणूका घ्यावयाच्या असल्याने ज्या जिल्हयांचे “ड” प्रकारच्या उर्वरित संस्थांचे सर्व प्रस्ताव प्राधिकरणाकडे

अद्याप प्राप्त झाले नसतील त्यांनी ते ०५ नोव्हेंबर, २०१४ पर्यंत प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी पाठवल्यास त्याला तातडीने मान्यता देऊन या निवडणूकादेखील दि.३०-११-२०१४ पर्यंत संपन्न होऊ शकतील. नोव्हेंबर महिन्यातच “क” प्रकारच्या संस्थांच्या निवडणूका घेण्याबाबतची कार्यवाही तालुका निवडणूक निर्णय अधिका-यानी करणे अपेक्षित आहे. याप्रमाणे “क” व “ड” प्रकारच्या संस्थांच्याच निवडणूका संपन्न झाल्यावर “अ” व “ब” प्रकारच्या संस्थांच्या निवडणूका या लगेच घेण्याची प्रक्रिया सुरु करता येईल. याचे कारण स्पष्ट आहे व ते म्हणजे प्राथमिक संस्थांच्या निवडणूका हया सर्व पुर्ण झाल्याशिवाय संघीय संस्थांच्या निवडणूका घेणे उचित होणार नाही.

४) जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-यांनी त्यांच्या जिल्हयातील प्रत्येक तालुक्यातील “ड” प्रकारच्या संस्थांच्या निवडणूकीबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणाने विहित केलेल्या नमुन्यात तातडीने म्हणजेच २८ऑक्टोबर पर्यंत कोणत्याही स्थितीमध्ये मान्यतेस्तव सादर करणे आवश्यक आहे. मात्र तालुक्यांकडील प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविण्यापुर्वी जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-यांनी प्रस्ताव तपासून Presiding Officers ची नियुक्ती करण्यासाठी प्रस्तावित केलेल्या अधिकाऱ्यांबाबत खातरजमा करुन घेणे आवश्यक आहे. म्हणजेच एका अधिकाऱ्यास दोन जवळच्या संस्थांच्या निवडणूका एका दिवसात घेता येतील.

५) “ड” प्रकारच्या संस्थांपैकी गृहनिर्माण सहकारी संस्थांच्या निवडणूका हया प्रामुख्याने रविवारी घेण्याबद्दल प्राधिकारणाने सुचीत केले असून हा कार्यक्रम करतांना संस्थांच्या सभासदांची संख्या लक्षात घेऊन रविवारी (१६ नोव्हेंबर व २३ नोव्हेंबर) या निवडणूकांचा कार्यक्रम सकाळी व संध्याकाळी अशा दोन सत्रात करता येईल त्यादृष्टीने नियोजन व्हावे.

६) प्रत्यक्ष निवडणूकांपुर्वी संबंधीत Presiding Officers च्या प्रशिक्षणबाबत जिल्हा सहकारी निवडणूक अधिका-यांनी आवश्यक ती व्यवस्था करणे गरजेचे आहे. या प्रशिक्षणामध्ये “ड” प्रकारच्या संस्थांच्या निवडणूकांच्या संदर्भात नियम ७६ चे पुर्णपणे विवेचन, तसेच विशेष अधिसभा/अधिमंडळ सभा बोलावण्याकरिताची नोटीस अचुक असणे, किमान १५ दिवसांचा अवधी दरम्यान असणे/मतदार यादी ही अचुक निर्दोष व पारदर्शक पध्दतीने तयार कलेली असणे, निवडणूकसाठीच्या नोटीसमध्ये सभेचे दिनांक आणि योग्य ते ठिकाण, वेळ, अचुक असणे. नोटीस ही संस्थेच्या सर्व सभासदांना प्राप्त झाल्याची खातरजमा करणे हया मुद्यांचा समावेश असावा. प्राधिकरणातर्फे हया विशेष अधिमंडळ सभेमध्ये घ्यावयाच्या निवडणुकीसंदर्भात अनुसरावयाच्या कार्यपध्दतीबाबत सविस्तर सुचना निर्गमित करण्यात आल्याआहेत. त्याबाबत सविस्तर विवेचन प्रशिक्षणात करण्यात यावे.

State Co-operative Election Authority, Maharashtra State, Pu.

७) प्रलंबित निवडणूकांसाठी प्राधिकरणाने दि.३१-१०-२०१४ ही मतदार यादी तयार करण्यासाठी अर्हता दिनांक घोषित केली आहे. हयादृष्टीने "क" प्रकारच्या संस्थांच्या निवडणूकांचे सविस्तर नियोजन तालुकानिहाय जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी हयांचे पर्यवेक्षणाखाली महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ मधील नियम ७५ प्रमाणे तंतोतंत पालन करणे आवश्यक आहे.

८) "क" प्रकारच्या संस्थांच्या निवडणूकाबाबत ३१-१०-२०१४ हया अर्हता दिनांकावर आधारीत प्राथमिक मतदार यादी संबंधित संस्थेने तयार करुन आवश्यक त्या Certificate सह दि.१०-११-२०१४ पर्यंत तालुका निवडणूक निर्णय अधिका-याकडे पाठविणे क्रमप्राप्त राहील.

९) तालुका सहकारी निवडणूक अधिकाऱ्यांनी "क" प्रकारातील संस्थांसंदर्भात तालुक्यात उपलब्ध मनुष्यबळाचा विचार करुन तसेच निवडणूकीसाठी पात्र असलेल्या संस्थांच्या संख्येचा विचार करुन सर्व संस्थांच्या निवडणूकांबाबतचा आराखडा तयार करावा.

**"क" प्रकारच्या संस्थांबाबत निवडणूकांचे नियोजन करतांना खालील टप्पे असतील.**

१) तालुक्यातील एकूण निवडणूकांसाठी पात्र संस्था विचारात घेऊन तालुका सहकारी निवडणूक अधिकाऱ्याने संस्थांसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे.

२) नियुक्त झालेल्या निवडणूक निर्णय अधिका-यांनी निवडणूकीचा कार्यक्रम नियम ७५ प्रमाणे तयार करुन त्यास तालुका सहकारी निवडणूक अधिकाऱ्याकडून मान्यता घेणे.

३) तालुका सहकारी निवडणूक अधिकाऱ्याने मान्यता दिल्याच्या पुढील दिनांकापासून निवडणूक कार्यक्रम प्रत्यक्षात सुरु होईल व प्राथमिक मतदार यादी प्रकाशित होईल.

४) प्रत्यक्ष निवडणूकीच्या कार्यक्रमाचे पुढील टप्पे (नियम ७५ मध्ये सविस्तर दिल्याप्रमाणे)

हया सर्व निवडणूक प्रक्रियेमध्ये निर्दोष, अचूक व पारदर्शक पध्दतीने नियमानुसार तयार करण्यात आलेल्या मतदारयादीस अनन्यसाधारण असे महत्व आहे. प्रत्येक संस्थेने प्राथमिक मतदार यादी तयार करतांना संस्थेच्या "आय" रजिस्टरशी मेळ घेऊन तसेच "जे" रजिस्टर अनुसार तयार केल्यानंतर कायद्यातील कलम २७ (१०) प्रमाणे थकबाकीदारांची नावे वगळून तसेच कायद्यातील अन्य संबंधित तरतुदीचे पालन करुनच केली जावी अशी अपेक्षा आहे. Active members बाबत, कायद्यातील कलम २६ च्या शेवटच्या परंतुकांची तरतूद स्पष्ट आहे त्यांचीही नोंद घ्यावी. प्राथमिक मतदार यादी ही तयार करण्याची जबाबदारी संस्थेच्या अधिका-यांची असल्यामुळे त्यांच्या निदर्शनास विद्यमान सहकारी कायद्यातील दंडात्मक तरतूदी **१४६ (e-२), (h-1), (k), (p) व (q)** हया

State Co-operative Election Authority * Maharashtra State, Pune-1 *

लक्षात आणून देणे गरजेचे राहील. हया तरतूदी अत्यंत कठोर असून निवडणूक प्रक्रियेसाठी देखील त्या प्रामुख्याने लागू राहतील. हया तरतूदी खालीलप्रमाणे.

**१४६ (e-२)** :- एखाद्या व्यक्तीने हेतुपुरस्सर कलम ७३ कअ, पोटकलम (१), खंड (एक) मधील स्पष्टीकरणातील शब्दप्रयोगाच्या अर्थान्तर्गत ही व्यक्ती "कसूरदार आहे" किंवा "कसूरदार नाही" अशा आशयाचे कोणत्याही नमुन्यात खोटे प्रमाणपत्र देणे; किंवा

**(h-1)** :- संस्थेची समिती किंवा तिचा अधिकारी किंवा सदस्य निवडणूकीमध्ये भ्रष्टाचाराच्या व्यवहारात गुंतलेला असणे किंवा;

**(k)** :- एखाद्या संस्थेच्या समितीने किंवा तिच्या अधिका-याने किंवा सदस्याने जाणूनबुजून खोटे विवरण तयार करणे, किंवा खोटी माहिती पुरविणे किंवा योग्य हिशोब ठेवण्यात कसूर करणे; किंवा

**(p)** :- एखाद्या संस्थेच्या कोणत्याही अधिका-याने किंवा सदस्याने कोणतीही पुस्तके, कागदपत्रे किंवा कर्जरोखे नष्ट करणे, त्यात खाडाखोड करणे, अनधिकृत फिरवाफिरव करणे, अन्यथा त्यात फेरफार करणे किंवा ती खोटी करणे किंवा छपवून ठेवणे किंवा अशा प्रकारे नष्ट करण्यात, खाडाखोड करण्यात, फेरफार करण्यात, खोटे करण्यात किंवा छपवून ठेवण्यात सहभागी होणे किंवा त्या संस्थेच्या मालकीच्या कोणत्याही नोंदवहीत, लेखापुस्तकात किंवा दस्तऐवजात कोणतीही खोटी किंवा लबाडीची नोंद करणे किंवा असे करण्यात सहभागी होणे; किंवा

State Co-operative Election Authority
Maharashtra State, Pune-1

**(q)** :- एखाद्या संस्थेच्या कोणत्याही अधिका-याने किंवा सदस्याने किंवा कोणत्याही व्यक्तीने नियमान्वये अपराध म्हणून जाहीर केलेले कोणतेही कृत्य करणे.

हया तरतुदींचे उल्लंघन झाल्यास कठोर शिक्षेची तरतूद कलम **१४७** मध्ये **(e-२), (h-1), (k), (p) व (q)** अनुसार करण्यात आलेली आहे त्या खालीलप्रमाणे.

**१४७ (e-२)** :- त्या कलमाच्या खंड (ई-२) खालील अपराध असल्यास तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा पंधरा हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील;

**(h-1)** :- त्या कलमाच्या खंड (ह-१) खालील अपराध असल्यास, पाच हजार रुपयापर्यंत

असू शकेल  इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(k) :- त्या कलमाच्या खंड (के) खालील अपराध असल्यास, एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील;

(p) :- त्या कलमाच्या खंड (प) खालील अपराध असल्यास, तीन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा किंवा पंधरा हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील;

(q) :- त्या कलमाच्या खंड (क्यू) खालील अपराध असल्यास एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

ह्या सर्व तरतुदी निवडणूकीसाठी नियुक्त करावयाच्या कर्मचारी/अधिकाऱ्यांच्या निदर्शनासही आणून देणे गरजेचे राहील. सर्व संस्थांच्या अधिका-यांना ह्या तरतुदीची स्पष्ट जाणीव करुन दिल्यास मतदार यादी अचूक, निर्दोष व पारदर्शक पध्दतीने होवू शकेल.

प्राधिकरणाने निवडणूकांसंदर्भात आजपावेतो खालीलप्रमाणे आदेश/परिपत्रके निर्गमित केलेली आहेत.

| अ.क्र. | विषय | जा.क्र. दिनांक |
|---|---|---|
| १. | प्राथमिक मतदार यादी स्विकारताना घ्यावयाचे प्रमाणपत्र | जा.क्र.रासनिप्रा/प्रा.मतदार यादी/प्रमाणपत्र/ ५४१/सन २०१४. दि. ०८/१०/२०१४ |
| २. | दि.३१/०३/२०१३ अखेर निवडणूकीस पात्र असणाऱ्या सहकारी संस्थांच्या प्राथमिक मतदार यादीकरीता अर्हता दिनांक निश्चित करणेबाबत. | जा.क्र.रासनिप्रा/अर्हता दिनांक/५४५/ सन २०१४. दि. १०/१०/२०१४ |
| ३. | परिपत्रक निवडणूक चिन्ह (symbols) विनिर्दिष्टीत करणे बाबत.. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ नियम २८ | जा.क्र.रासनिप्रा/निवडणूक चिन्ह/५४४/ सन २०१४. दि. १०/१०/२०१४ |
| ४. | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधकांना मान्यता आदेश | जा.क्र.रासनिप्रा/जिल्हासनिअ आदेश/५४९/ सन २०१४. दि. १०/१०/२०१४ |
| ५. | (सर्व) तालुका-प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधकास मान्यता आदेश | जा.क्र.रासनिप्रा/तालुका-प्रभाग सनिअ आदेश/५५०/ सन २०१४. दि. १०/१०/२०१४ |
| ६. | दि.३१/०३/२०१३ अखेर निवडणूकीस पात्र असणाऱ्या सहकारी संस्थांच्या प्राथमिक मतदार यादीकरीता अर्हता दिनांक निश्चित करणेबाबत.शुध्दीपत्रक | जा.क्र.रासनिप्रा/अर्हता दिनांक/शुध्दीपत्रक/ ५५१/सन २०१४. दि. १४/१०/२०१४ |

State Co-operative Election Authority * Maharashtra State, Pune

| | | |
|---|---|---|
| ७. | तालुका-प्रभाग सनिअ आदेश ता.मालवण,जि.सिधुदुर्ग | जा.क्र.रासनिप्रा/तालुका-प्रभाग सनिअ आदेश/५५६/ सन २०१४. दि.१६/१०/२०१४ |
| ८. | ड वर्गातील सहकारी संस्थांचे समिती निवडणूक प्रक्रीयेमध्ये अनुसरावयाच्या सर्वसाधारण मार्गदर्शन सुचना | जा.क्र.रासनिप्रा/ड वर्ग सह.सं/निवडणूक मा.सु/५५८/ सन २०१४. दि. १८/१०/२०१४ |
| ९. | जिल्हा सहकारी निवडणूक अधिकाऱ्यांना नियम ३(i) चे अधिकार देणेबाबत | जा.क्र.रासनिप्रा/जिसनिअ/अधिकारप्रदान/५६४/सन २०१४. दि. २०/१०/२०१४ |
| १०. | सहकारी संस्थांच्या निवडणूकांसाठी आचारसंहिता बाबत | जा.क्र.रासनिप्रा/आचारसंहिता/५६२/सन २०१४ दि.२०/१०/२०१४ |
| ११. | (सर्व) तालुका-प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून मान्यता आदेश | जा.क्र.रासनिप्रा/तालुका-प्रभाग सनिअ आदेश/५६९/ सन २०१४ दि.२८/१०/२०१४ |

आगामी निवडणूका या विभागातील सर्वच अधिकाऱ्यांना व क्षेत्रिय अधिकाऱ्यांना एक आव्हान आहे. फार मोठे मनुष्यबळ या निवडणूकांसाठी आवश्यक असणार असल्याने त्याबाबत नियोजन करणे जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी व तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना आवश्यक आहे. यासाठी जिल्हा स्तरावर व तालुका स्तरावर येत्या काही कालावधीसाठी तज्ञ,अभ्यासू, अनुभवी कर्मचारी/अधिकाऱ्यांचा कक्ष स्थापन करणेही गरजेचे आहे. प्रदिर्घ काळानंतर या निवडणूका होणार असल्याने त्या भयमुक्त, मोकळया, पारदर्शक पध्दतीने संपन्न् होणे विभागाच्या दृष्टीने अत्यावश्यक आहे. मला आशा आहे, नव्हे खात्री आहे की आपणाकडून हयासंदर्भात प्राधिकरणाने दिलेल्या सूचना, कायद्यातील तरतूदी, तसेच नियम व उपविधीचे निवडणूकांकामी तंतोतंत पालन होऊन सहकारी संस्थांच्या आगामी सर्व निवडणुका भयमुक्त, मोकळया वातावरणात पारदर्शक पध्दतीने, अचूक व निर्दोषपणे पार पाडल्या जातील.

धन्यवाद !

State Co-operative Election Authority Maharashtra State, Pune

(मधुकर चौधरी)

प्रति,

१.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

२.जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

३.तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

प्रत माहितीसाठी :

१.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

२.साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे

३.आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास, मुंबई

४ .संचालक हातमाग,यंत्रमाग व वस्त्रोद्योग नागपूर/मुंबई